# राशिभविष्य - जुलै, २०१५.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

===========================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साध्य करावयाचे ते साध्य करून घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करावा. काहीना बढती, काहीना उच्च पद तर काहीना मानाचे स्थान मिळू शकेल. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वाचे कौतुक करतील. आरोग्यही चांगले राहील. पण महिब्याच्या उत्तरार्धात परिस्थिती ची अनुकुलता लाभणे शक्य दिसत नाही. स्वभाव विक्षिप्तहोणे संभवते. शनि-हर्षल प्रतिकुल असल्याने शारीरिक, मानसिक अनारोग्य होणे संभवते. तसेच मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. कौटुंबिक व गृहसौख्याचे दृष्टीने विचार करता महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुख समाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्य , नियोजित कार्यात येणारे अडथळे. कौटुंबिक त्रास , भांडणे, खर्च वाढ, मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे असह्य मनस्ताप होणे संभवते. पण अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहींचे कौतुक होईल, काहीना पुत्रप्राप्ती होणे संभवते. काहींचे प्रेमसंबंध निर्माण होतील, विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरतील, अर्थलाभ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहारही मनासारखे होतील. ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. शिवोपासना व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. आर्थिक चिंता, वाढता खर्च , फसवणूक, आप्तेष्ट भांडणे, अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. येणे वसूल होणार नाही; पण देणे मात्र कसे द्यावे याची चिंता त्रस्त करील. अधिकअर्थप्राप्तीसाठी होणाऱ्या कष्ट दगदगीमुळे शारीरिक आरोग्य बिघडून उष्णता विकार बळावतील. डोळे, मान, घसा, दाढा यापैकी कसल्या तरी आजाराने त्रस्त होणे संभवते. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल.

गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार मनासारखे घडून येतील. पण नातेवाईक मंडळीपासून त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना नोकरीत विविध प्रकारचे लाभ होतील. काहीना प्रवासाचे योग येतील. पण या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे या राशीच्या मंडळीच्या संतती सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे दाम्पत्य जीवनातही सुखशांती मिळेलच याची खात्री देता येत नाही. मित्रांशी वाद, भांडणे टाळा. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता जाणवते. पण गुरु-हर्षल शुभ योगामुळे अनपेक्षितपणे धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेवदत्तात्र ेयाची उपासना अनुकुल होईल. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमितपणे पठण करा.

(३) **मिथुन** - रवि-मंगळ हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या काळात प्रतिकुल असल्यान े या राशीच्या मंडळीनी स्वत:च्या स्वाभाविक दोषांवर नियंत्रण ठेवून आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. कारण या प्रतिकुल काळात सतत मनाविरुद्ध घनिटना घडण्याची शक्यता असल्यामुळे स्वत:वरच संतापून हातून अविचाराची कृत्ये घडण्याची शक्यता असते. बुद्धी व विचार विकृत होणे शक्य असते. अकारण दगदग केल्यास हाती काहीही न लागता केवळ शारीरिक-मानसिक थकावट सहन करावी लागेल. त्यातून अनारोग्य होणेही शक्य असते. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असलेल्यांनी तर आवर्जून जपले पाहिजे. गैरसमजाने घरातील मंडळीशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. विचार न करता फाजील विश्वासाने आर्थिक व्यवहार केल्यास फसवणूक होण्याची शक्यता आहे.जपा. अशा प्रतिकुल काळातही उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे कुट ुंबात शुभ घटना घडतील व दिलासा मिळेल. तरीही चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे गृहसौख्यात विविध कारणांनी बाधा येणे शक्य दिसते. जपा. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथ रूपाने प्रकाशित होईल. प्रवासाचे योग येतील. शनि-हर्षल शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन व्यवसाय असण ारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांनी हातचे सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. आहे तीच नोकरी वा व्यवसाय मनापासून करावा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काहींना सूचक स्वप्ने पडतील,

तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व त्यामुळे सात्विक समाधान व शांती मिळेल.

**(४) कर्क** - मन व बुद्धीला असह्य ताण देणारा असा या महिन्याचा काळ अशुभ असल्याचा अनुभव येईल. गैरसमज, भांडणे, मानहानी अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल. जपा. त्यात आर्थिक समस्या, वाढता खर्च , पराजय अशापैकी घटनांची भर पडून चिंतित व्हाल. जपा. घरीदारी, नोकरी-व्यवसायाचे ठिकाणी मनावर ताबा ठेवून व शांतपणे विचारपूर्वक आचरण कराल तर सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे ज्या मनोनुकुल घटना घडतील, आर्थिक समस्या सुटतील त्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व नोकरी-व्यवसायात शुभ घटना घडून मन:शांती लाभेल. चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्य लेखन व्यवसाय असणारांना संपूर्ण संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीनी मात्र सहनशीलतेचे व नम्रतेचे आचरण करावे व विपरीत काळाशी मुकाबला करावा. तेच सुखाचे होईल. राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. शत्रुराशीतील शनिमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा निर्माण होईलसे दिसते. जपा. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशवारीचे योग येणे शक्य दिसते. जलभय असल्याने पाण्याशी संबंध असलेल्यांनी विशेष जपावे. तसेच विषभय असल्याने बाहेरचे खाणेपिणे टाळावे. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाचे उपासना करा व "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

**(५) सिंह** - या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या साहित्यिकांना, कलाकार मंडळीना, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना, एकूण सर्वांनाच महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार आहे. म्हणून त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साध्य करावयाचे ते साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. महिन्याचा उत्तरार्ध मन व बुद्धी स्थिर राखून संयमाने व सहनशीलतेने आचरण करणे जमले तरच होणारा मनस्ताप व अनारोग्य सुसह्य होईल. आर्थिक चिंता, अनारोग्य विविध कारणांनी होणारा मनस्ताप, श्रम , कष्ट, दगदग यांनी थकून जाल. जपा. काही मंडळीना त्वचारोग, काहीना रक्तविकार तर काहीना मुख-दंत

रोग त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य त्रास सहन करावा लागेल. जपा. कौटुंबिक सुख व गृहसौख्य यामध्येही बाधा निर्माण होणे संभवते. वैवाहिक जीवनात दोघांचे वा कोणा एकाचे अनारोग्यामुळे, मतभेदामुळे , संशयामुळे किंवा अन्य कारणाने वैवाहिक जीवनातील सुखसमाधानात बाधा येणे संभवते. जपा. मित्र मैत्रिणीशी असणारे प्रेमाचे संबंध तुटणार नाहीत याची काळजी घ्या. समाजकार्याची आवड असणारांना, अध्यात्मात रस असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुलहोईल. श्रद्धेने शिवोपासना, कुलदैवत उपासना करा. आहे त्या परिस्थितीत नम्रतेने आचरण करून विपरीत काळ व्यतीत करा.

**(६) कन्या -** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक जाईल. इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. काही मंडळीना थोरामोठ्याच्या ओळखीने मनासारख्या गोष्टी घडवून आणणे शक्य होईल. काही मंडळीना बढती, काहीना उच्च पद तर काहीना मानाचे स्थान मिळू शकेल. गुरु-शनि शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, शास्त्रीय संशोधन नोकरी-व्यवसाय असणाराना काळ प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. अन्य कोणताही स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यावसायिक प्रगती करणे शक्य होईल. पण शत्रुराशीतील मंगळामुळे काही मनस्ताप देणाऱ्या घटना घडणेही शक्य दिसते. जपा. युवकांना अपेक्षित नवे कार्यक्षेत्र वा नवी नोकरी मिळू शकेल. काही मंडळीना उगीचच आपल्याला काही तरी नवा आजार झाल्याची भावना होईल. काल्पनिक चिंता त्रस्त करतील. भावंडविषयक एखादी चिंता त्र स्त करील. जीवनसाथीचे लहरी विक्षिप्त आचरण, पतिपत्नी मतभेद, वाद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील आनंद मिळणे अशक्य होईल. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर त्यात अपयश येण्याची शक्यताच अधिक दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. काही मंडळीना त्वचा रोग, काहीना मुखदन्त रोग तर काहीना रक्तविकाराचा त्रास होणे संभवते. जपा. उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे व मन:शांती मिळविणे शक्य होईल. सामाजिक कार्यात यश मिळेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व सात्विक सुखशांती मिळेल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. नोकरीत मानसिक ताण, मानहानी होणे संभवते. जपा. घरगुती परिस्थितीत वडील मंडळीचा विरोध सहन करावा लागेलसे दिसते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास , मानहानी होणे संभवते. पण महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-हर्षल शुभ योगामुळे शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, तसेच शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणारांना आणि अन्य बौद्धिक क्षेत्रात , वकिली, सल्लागारी व्यवसायात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळीना अर्थलाभ होईल; तर काहीना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. हितशत्रूपासून रक्षण करील. मन अत्यंत भावनाशील झाले असेल व अध्यात्माची मनापासून ओढ असेल तर उपासनेद्वारे सात्विक सुखशांती मिळू शकेल. शत्रुराशीतील शनीमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणयाची शक्यता आहे. जपा. तसेच कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा मनस्ताप सहन करावलागेल. त्यामुळे आर्थिक समस्याही त्रस्त करतील. अशा परिस्थितीत मन व बुद्धी शांत ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल गुरुशुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेलं. हर्षलमुळे काहीना डोकेदुखीचा तर काहीना मेंदूविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीनी सध्या स्वत:च्या सर्व प्रकारच्या आरोग्याकडे लक्ष देणे अगत्याचे होईल. शत्रुराशीतील मंगळ व शत्रुराशीतील शनि आणि रवि हे तीनही शक्तिशाली ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. जपा. तसेच काही मंडळीच्या जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. काहींच्या कुटुंबातील प्रिय जनांचे स्थलांतर झाल्यामुळे त्यांची अनुपस्थिती अस्वस्थ करील. राहूमुळे अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. तसेच केतूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती त अडथळे होण्याची दाट शक्यता दिसते. पण महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-हर्षल शुभ योग असल्यामुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा विरोध वा मतभेद सहन करावे लागतील

काही मंडळीना शारीरिक कष्ट, दगदग सहन करावी लागेल; तर काहीना मूळव्याधीसारख्या उष्णताविकाराचा त्रास सहन करावा लागेल. अपघात भय असून पाणी व वीज यांपासूनही धोका संभवतो. जपा. महिन्याचा उत्तरार्ध चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शिक्षणक्षेत्र असे कार्यक्षेत्र असणारांनाकाळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण कलाक्षेत्रातील मंडळीना अडचणीना तोंड देत काळ व्यतीत करावा लागेलसे दिसते. नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह प्रयत्नपूर्वक टाळाच. श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना नियमितपणे करा व मनावर संयम ठेवून व सहनशील बनून सदैव आचरण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात सतत तक्रारखोर स्वभावामुळे आहे त्या परिस्थितीत सुखासमाधानाने काळ व्यतीत करणे अशक्य होईल. कोणी समजावण्याचा प्रयत्न केला तरी ते सहन होणार नाही. मन अतिशय भावनाशील झाले तर त्यामुळे कोणाशी पटणारच नाही. जपा. मन:शांतीसाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. अशा प्रति कुल काळातही काहीना जलप्रवासाची तर काहीना परदेशगमनाची संधी मिळण्याची शक्यता दिसते. वैवाहिक जीवनात मतभेद, वाद, भांडणे अशापैकी कारणांनीअस्वस्थ व्हाल. त्यामुळे शारीरिक आरोग्य बिघडून काहीना ताप येणे, काहीना पोटविकाराचा त्रास होणे, तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. भागीदारीत व्यापार व्यवसाय असेल तर गैरसमजामुळे, संशसावधानतेने यामुळे भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्या. सर्व आर्थिक व्यवहार जपून, सावधानतेने व फसवणूक होणार नाही, याची काळजी घेऊनच करा. शत्रुराशीतील व्ययस्थानी असलेला शनि महिन्याच्या पूर्वार्धात फारसा प्रतिकुल होणार नाही; पण उत्तरार्धातमात्र तो सतत मनस्ताप देणारा असाच असल्याचे अनुभव येतील. अशा प्रतिकुल काळातही ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहीना तसा धनलाभ किंवा वारसाहक्काने धनलाभ मिळणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात भाग्यस्थानी असलेल्या गुरु-शुक्रामुळे गुरुकृपा सज्जनांचा सहवास, थोरंकृपा, अनुकुल संधी, अध्यात्मात प्रगती अशा सुखसमाधान देणाऱ्या घटना घडतील.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही बाबतीत अनुकुल

व लाभदायक होईल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्राहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण इतरांना विविध प्रकारच्या आर्थिक चिंता त्रस्त करतील. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होणार असल्याने त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याचा उत्तरार्ध मनस्ताप देणारा असाच असण्याची शक्यता जाणवते. मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता भडकून काहीना ताप येणे, काहीना इजा होणे, काहीना अंगावर फोड येणे तर काहीना रक्तविकाराचा त्रास होणे संभवते. हृदयविकार असणारांनी तर मन व बुद्धी शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न करावा. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशांना असा धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. काहीना भूमिलाभ तर काहीना मानसन्मान लाभणेही शक्य दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात दाम्पत्य जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. जपा. तसेच काहीना पोटविकाराचा तर तर काहीना मूत्रविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. पण गुरु ग्र हाच्या अनुकुलतेने नवे मैत्रीचे संबंध निर्माण होणे संभवते. जुने प्रेमसंबंध दृढ होतील. विवाहोत्सुक असणारांचे विवाहही ठरतील. शुक्र ाच्या अनुकुलतेने काहीना भूमिलाभ तर काहीना मान, प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यता दिसते. पण भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

(११) **कुंभ** - सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत कोमल झाले असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे तीव्र मानसिक स ंवेदनाहोत असतील. अशा अवस्थेत थोडेही मनाविरुद्ध काही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे असे वाटते. त्यातच बुद्धी व विचारशक्ती च ंचलव अस्थिर झाली असेल तर अविचाराचे आचरण होणेही शक्य दिसते. बोलणे फटकळ व धारदार होत असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यातच आर्थिक चिंताही त्रस्त करत असतीलच. महिन्याच्या पूर्वार्धात स्वत:चे अनारोग्य, संततिसमस्या, प्रिय जनांपासून झालेला दुरावा, नोकरीत वरिष्ठांचा त्रास , अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होणेही संभवते. या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. पण जीवनसाथीचे अनारोग्य, कुसगतीमुळे होणारे

दुष्परिणाम सहन करावे लागतील. गुरु ग्रह सप्तम स्थानी आल्यावर या राशीच्या विवाहेच्छूचे विवाह ठरतील. नवे प्रेमसंबंध व स्नेहसंबंध न िर्माण होतील. प्रवासाचे योग येतील व काहीना धनलाभ होणेही शक्य आहे. मात्र शासकीय नोकरीत सहज वाममार्ग धन मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्ष ानेटाळाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. वकिली, सल्लागारी व्यवसाय, हिशेब, कोळसा व्यापारी, खाण उद्योग असे व्यवसाय असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीहनु मान उपासना व श्रीदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अतिशय अस्थिर, लहरी, चंचल झाला असण्याची शक्यता जाणवते. तसेच कोणाचा धाक वा कोणी केलेला उपदेश सहन होत नसावा, असेही दिसते. सतत गुलहौशीपणा, ऐषाराम यातच काळ व्यतीत करण्याचा मोह असावा, असे वाटते. मन व बुद्धीच्या स्थिरतेसाठी या राशीच्या मंडळीनी भगवान शंकराची उपासना करावी, असे सांगावेसे वाटते. या राशीच्या लहान मुलांकडे पालकांनी विशेष लक्ष पुरविणे अगत्याचे होईल. समाजकार्याची व अध्यात्माची आवड असणारांना या संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व सुखशांती देणारा असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा पूर्वार्ध च अनुकुल आहे. उत्तरार्धात अनारोग्य, अस्वस्थ मन अशापैकी कारणांनी अभ्यासात अडथळे निर्माण होणे संभवते. पण सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले तर गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे नको ते आचारविचार मनात येतील व हातून नको ते घडू शकेल. जपा. तसेच हा राहू वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा निर्माण अरू शकेल. जपा. शनी-हर्षल शुभ योगामुळे चिकित्सक उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगती करणे व यश मिळवणे शक्य होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीनी मनावर ताबा ठेवून व सहनशील बनूनच प्रतिकूल काळ व्यतीत करावा, हे उत्तम. श्रद्धा असेल तर नियमितपणे श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा व दररोज “ बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====ooooo0ooooo=====